# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 01 November 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ दुपारी १.०० वा.**

****

छत्तीसगड राज्याच्या स्थापनेला आज २५ वर्षे पूर्ण झाली असून हे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते छत्तीसगड विधानसभेच्या नव्या आधुनिक इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. संपूर्णतः सौर उर्जेवर संचलित अशी ही इमारत ग्रीन बिल्डिंग संकल्पनेवर बांधली गेली आहे. विधानभवनाच्या उद्घाटनापूर्वी मोदींच्या हस्ते माजी पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. तत्पूर्वी, त्यांनी रायपूर इथं रोडशो केला. आज होणाऱ्या विविध कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते १४ हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विकास प्रकल्पांचा शुभारंभ आणि भूमिपूजन होणार आहे. यामधे रस्ते, उद्योग, आरोग्यसेवा, देखभाल आणि ऊर्जा यांसारख्या विविध क्षेत्रांशी संबंधित पकल्पांचा समावेश आहे. सकाळी मोदी यांनी सत्य साई संजीवनी रुग्णालयात ‘दिल की बात’ या कार्यक्रमात जन्मजात हृदयरोग असलेल्या आणि यशस्वी उपचार झालेल्या सुमारे अडीच हजार बालकांशी संवाद साधला.

****

छत्तीसगडच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज रायपूरमध्ये प्रजापिता ब्रह्मकुमारी शांतीशिखर या केंद्राचं उद्घाटन केलं. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, ब्रम्हकुमारींचे आचरण हे वंदनीय आहे. आचरण हा सर्वात मोठा धर्म आहे. येथे शब्द कमी आणि सेवा अधिक असते. संकटग्रस्त देशांसाठी भारत एक विश्वासार्ह भागीदार आहे. जागतिक शांततेसाठी भारताचे अविरत प्रयत्न सुरू आहेत. आणि ब्रम्हकुमारी या जागतिक शांततेच्या संकल्पनेचा एक भाग आहेत. पंतप्रधान पुढे म्हणाले की, अध्यात्म हा भारताचा पाया आहे. हेच कार्य ब्रम्हकुमारी पुढे नेत आहेत. आम्हाला प्रत्येक जीवामध्ये शिव दिसतो. आपले अध्यात्म देखील शांततेचाच मार्ग दाखवते. आपण नद्यांना माता मानतो

आणि झाडे आणि वनस्पतींमध्ये देव पाहतो. हे कार्य पुढे नेण्यात ब्रह्मकुमारींनी मोठे योगदान दिले आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज आंध्र प्रदेश, छत्तीसगड, हरियाणा, कर्नाटक, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पंजाब आणि पुदुच्चेरी राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त तिथल्या जनतेस शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व राज्यांनी देशाच्या प्रगतीत उल्लेखनीय योगदान दिलं असून, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विकास यात्रेत सातत्याने नवे कीर्तिमान प्रस्थापित व्हावेत, अशी इच्छा मुर्मू यांनी व्यक्त केली. राष्ट्रपतींनी या सर्व राज्यांतील रहिवाशांच्या चिर समृद्धी आणि कल्याणासाठीही शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही छत्तीसगड, आंध्र प्रदेश सहित सर्व राज्यांच्या स्थापना दिवसानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

****

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीचे अर्ज नियमानुसार ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पध्दतीने स्वीकारण्यात येत आहेत. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना यासंबंधी सूचना दिल्या आहेत.

****

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकानं मुंबई विमानतळावर एका विशेष कारवाईत ४.७ किलो कोकेन जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात या कोकेनची किंमत ४७ कोटी रुपये असल्याचे अनुमान आहे. या प्रकरणात आतापर्यंत पाच संशयितांना अटक करण्यात आली आहे. मुंबई विमानतळावर ड्रग्ज तस्करीविरुद्ध विशेष कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत कारवाईचा एक भाग म्हणून या पथकाने मुंबई विमानतळावर कोलंबोहून येणाऱ्या एका महिला प्रवाशाला रोखले. तिच्या सामानाची तपासणी केली असता, कॉफी पावडरच्या नऊ पॅकेटमध्ये एक पांढरा पदार्थ लपवून ठेवण्यात आला होता. त्यानंतर महिलेला अटक करण्यात आली. चौकशीनंतर आणखी चार संशयितांना अटक करण्यात आली.

****

गोव्यामध्ये सुरू झालेल्या फिडे बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या ट्रॉफीला पाच वेळा विश्वविजेता असलेल्या भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथ आनंद यांचे नाव देण्यात आले आहे. काल या बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटन समारंभप्रसंगी या ट्रॉफीचं अनावरण करण्यात आलं.

****

ज्येष्ठ हिंदी साहित्यिक पद्मश्री रामदरश मिश्र यांचं काल रात्री दिल्ली इथं निधन झालं. ते १०२ वर्षांचे होते. मिश्र यांना याच वर्षी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. मिश्र यांना २०१५ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार आणि २०२१ मध्ये व्यास सन्मानासह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलं आहे. रामदरश मिश्र यांनी शंभरहून अधिक कविता, कथा, कादंबऱ्या, संस्मरणे आणि समीक्षा ग्रंथांची निर्मिती केली.

****

मराठी आणि इंग्रजी या भाषा पहिलीपासून आणि हिंदी पाचवीपासून शिकवण्याची सध्या सुरू असलेली पद्धतच कायम राहावी, असं मत रत्नागिरी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर व्यक्त झालं, अशी माहिती त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली. ते काल रत्नागिरी इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. हिंदी भाषेच्या सक्तीवरून झालेल्या गदारोळानंतर नेमण्यात आलेल्या त्रिभाषा धोरण समितीने आज रत्नागिरीत विविध क्षेत्रांतल्या नागरिकांची या विषयावरची मतं जाणून घेतली. केवळ एका ठिकाणी बसून अहवाल तयार करण्यापेक्षा तो सर्वसमावेशक होण्यासाठी राज्यात आठ ठिकाणी फिरून, विविध स्तरांतल्या नागरिकांच्या भावना आम्ही जाणून घेत आहोत, असे जाधव म्हणाले.

****